# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक ०७/०२/२०२५ रोजी प्राप्त तसेच
## दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

(प्रशासकीय विषय)

विषय क्रमांक २०९ - प्रशासकीय विषय अमरावती महानगरपालिका अंतर्गत होणा-या विकास कामांच्या साहित्य तपासणी करीता M/S SD GEOTESTING SOLUTION AND AND CONSULTANT PVT.LTD. अमरावती या खाजगी संस्थेस Empaneled करुन नियुक्त करणे बाबत.

ठराव क्रमांक २०९ - उपरोक्त विषयाला अनुसरुन M/s S.D. GEOTESTING SOLUTION AND CONSULTANT PVT.LTD. अमरावती ही संस्था NABL (National Accreditation Board for Testing & Calibration Laboratories) प्रधोकृत प्रयोग शाळा असुन त्यांच्या महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रयोग शाळा असुन त्यामध्ये ते विविध शासकीय व निमशासकीय संस्थेशी Empaneled आहेत. त्यामध्ये महानगरपालिक चंद्रपुर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चंद्रपूर और जिल्हापरिषद, चंद्रपुर, पाटबंधारे विभाग, अमरावती, जिल्हापरिषद, सोलापुर, एम.आय.डी.सी छत्रपती संभाजीनगर या जिल्हापरिषद, अमरावती, जिल्हापरिषद, यवतमाळ, इत्यादी संस्थेचा संमावेश आहे.

सदर कंपनीची एम.आय.डी.सी अमरावती येथे प्रयोग शाळा असुन सदर प्रयोगशाळेची पाहणी करण्यात आलेली असून प्रयोगशाळा अत्याधुनिक इमारत, equipment's व मनुष्यबळइत्यादीनी सुसज्ज आहे.

अमरावती महानगरपालिका अंतर्गत होणा-या विकास कामांच्या साहित्य तपासणी करीता या कंपनीस ती अमरावती महानगरपालिकेसोबत Empaneled केल्यास गुणवत्ता व त्वरीत विकास कामे साहीत्य तपासणी मिळण्यास त्वरित चांगली सेवा होईल.

मा. आयुक्त यांचे मान्यते नुसार M/s S.D. GEOTESTING SOLUTION AND AND SULTANT PVT.LTD. अमरावती यांनी Empaneled करण्याकरीता प्रशासकीय विषयास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | |
|---|---|
| स्वा./- | स्वा./- |
| नगरसचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका,अमरावती |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.